शैक्षणिक वर्ष २००६-०७ करीता औषधनिर्माणशास्त्राचा पदविका अभ्यासक्रम राबविण्यास नविन संस्थांना मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००५/(७०३/०५)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २४ मे २००६

**संदर्भ :-** १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.३३८२/११८३६/(१९०)/तांशि - १अ, दिनांक २१ मे, १९८३.
२.शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र जीईसी २०९७/(१३८/९७)/तांशि-१, दि. १९ ऑगस्ट, १९९८.
३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र मान्यता २००५/(६३९/०५)/तांशि-६, दि. १५ मार्च, २००५.
४.शासनाचे पत्र क्र. मान्यता-२००५/ (७०३/०५)/ तांशि-६, दि.१ एप्रिल २००६

**शासन निर्णय :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील औषधनिर्माणशास्त्राचा पदवीका अभ्यासक्रम राबविण्यासाठी नवीन संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार यासाठी उपरोक्त संदर्भ-३ नुसार राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू समितीच्या शिफारशी शासनाच्या संदर्भ- ४ मधील पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने राज्यस्तरीय समितीच्या शिफारसी विचारात घेऊन मान्यता दिलेल्या संस्थांना या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ ते ५ मध्ये नमूद केल्या प्रमाणे औषधनिर्माणशास्त्राचा पदवीका अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २००६-०७ साठी निम्न अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

- उपरोक्त संदर्भ -१ मधील शासन निर्णयान्वये विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती संबंधित संस्थेस बंधनकारक असतील.
- उपरोक्त संदर्भ -२ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान ५ वर्षे कालावधीसाठी आवश्यक मुदतठेवीची रक्कम संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संयुक्त खात्यात जमा करावी लागेल.
- शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणा-या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भाधिन पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.
- सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील.

PRINCIPAL
AV EDUCATION SOCIETY'S
COLLEGE OF PHARMACY
NARHE, PUNE - 41

PRINCIPAL
AV EDUCATION SOCIETY'S
COLLEGE OF PHARMACY
NARHE, PUNE - 41.

* सदर संस्थांनी पुढील शैक्षणिक वर्षात फार्मसी अॅक्ट १९४८च्या कलम-१२ मधिल तरतूदीनुसार फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधन कारक राहील.

वरील व अन्य औपचारिक बाबी संबंधी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संबंधित संस्थांशी आवश्यक करारनामा करुन सदर संस्थांनी आवश्यक शिक्षक वर्ग नियुक्त केल्याची व या संस्थांत ग्रंथालय तथा प्रयोगशाळा पुर्णपणे कार्यान्वीत झाल्याची खात्री करावी व त्या नंतर सदर संस्थात प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी व तद्नुषंगाने संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.बा.तुंबारे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई
४. संबंधीत संस्था

**प्रत माहितीसाठी**

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेस, आय.पी. इस्टेट, नवी दिल्ली - ११० ००२.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल अॅश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई -२०.
३. निवड नस्ती / तांशि -६

TRUE-COPY

PRINCIPAL
ABHINAV EDUCATION SOCIETY'S
COLLEGE OF PHARMACY
NARHE, PUNE - 411 041.

PRINCIPAL
ABHINAV EDUCATION SOCIETY'S
COLLEGE OF PHARMACY
NARHE, PUNE - 41.

परिशिष्ट-२

शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००५/(७०३/०५)/तांशि-६, दिनांक- २४ मे २००६

(एकुण संस्था-२६)

| Sr. No. | Name of the Society | Name of the Institute | Intake | Duration of the course | Entry level | Period of Approval | AICTE letter no. & date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Pune Region** | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | Abhinav Education Society, 20/2/1 Ganaraj Heights Kashinath Patil Nagar, Dhankawadi, Dist. Pune | Abhinav Education Society's College of Pharmacy, Narhe, Haveli, Dist. Pune | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2432/2006, 2nd May, 2006. |
| 2. | Alard Charitable Trust, 2nd floor, Alankar Cinema Building, Pune-411 001. | Alard College of Pharmacy, S. No. 47 & 50 At. Marunje, Mulshi, Near Rajiv Gandhi Infotech Park, Pune. | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2433/2006, 2nd May, 2006. |
| 3. | Ambabai Talim Sanstha, Sangli Miraj Road, Near Kripamayee Hospital, Wanlesswadi, Miraj, Dist. Sangli | Diploma in Pharmacy Sangli Miraj Road, Wanlesswadi, Miraj, Dist. Sangli | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2434/2006, 2nd May, 2006. |
| 4. | Balasaheb Mane Shikshan Prasarak Mandal, A/P Ambap Hatkanagale Dist . Kolhapur | Womens College of Pharamacy, Plot no.46/ B, A/P, Peth, Vadgaon, Hatkangale, Dist. Kolhapur | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2435/2006, 2nd May, 2006. |
| 5. | Choudhary Attarsing Yadav Memorial Education Trust, 1st Floor, Pride Plaza, Batter Road, Ambedkar Statue, Pimpri, Dist. Pune- | Siddhant College of Pharmacy, A.P.Sudumbare Maval, Dist. Pune . | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2436/2006, 2nd May, 2006. |
| 6. | Dr. D.Y. Patil Prathisthan Opp. H.A. Factory Pimpri Dist. Pune | Padmashree Dr. D.Y.Patil Pharmacy Polytechnic, Sector no. 29, Pradhikaran, Pune | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2437/2006, 2nd May, 2006. |

(सु. वा. तुर्कार)